# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या,**

१. जम्मू काश्मीरमधल्या पहलगाम जिल्ह्यात दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात अनेक पर्यटकांचा मृत्यू

२. हल्ल्याचा देशभरातून तसंच जगभरातल्या नेत्यांकडूनही निषेध

३. पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाचा दौरा आटोपता घेऊन भारतात परतले, विमानतळावरच केली संबंधितांशी चर्चा

४. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर, शक्ती दुबे देशात पहिली

५. गरीब मुस्लिमांच्या भल्यासाठीच वक्फ कायद्यात सुधारणा केल्याचा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रीजिजू यांचा पुनरुच्चार

आणि

६. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्स संघाचा लखनौ सुपर जायंट्स संघावर 8 गडी राखून विजय

**जम्मू काश्मीर दहशतवादी हल्ला**

जम्मू काश्मीरमधल्या पहलगाम जिल्ह्यात काल दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये नौदलाच्या अधिकाऱ्यासह 2 परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्यात 20 पर्यटक जखमी झाल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. अद्याप ओळख पटवण्याचं आणि बचावकार्य सुरू असल्यामुळे मृतांचा आणि जखमींचा नेमका आकडा स्पष्ट नसल्याचं सुरक्षा दलाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं. लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेच्या द रेझिस्टन्स फ्रंट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. दरम्यान, या भ्याड हल्ल्याच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी आपली शोधमोहीम तीव्र केली आहे. केंद्रिय गृहमंत्री अमित शहा श्रीनगरला काल पोहोचले असून त्यांनी सुरक्षा दलांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांसमवेत उच्च स्तरीय बैठक घेतली. आज ते नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्यासह घटनास्थळी भेट देणार आहेत. तसंच जखमींची विचारपूस करुन ते घटनेच्या साक्षीदारांशी संवाद साधतील. लष्कराच्या उत्तर विभागाचे कमांडर आज श्रीनगरला पोहोचतील आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेचा ते आढावा घेणार आहेत दरम्यान, या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला सौदी

अरेबियाचा दौरा सोडून भारतात परतले आहेत. भारतात आल्यानंतर त्यांनी विमानतळावरच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित  डोवाल यांच्यासह वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला. पंतप्रधानांनी या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या हल्ल्याच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई केली जाईल. दहशतवाद्यांचे दुष्ट मनसुबे कधीच सफल होणार नाहीत असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही जम्मू काश्मीरमधल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करुन मृतांच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. हे अत्यंत घृणास्पद आणि अमानवीय कृत्य असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे.
जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्यासह अनेक केंद्रिय मंत्र्यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश यादव, एलजेपी पक्षप्रमुख केंद्रिय मंत्री चिराग पासवान तसंच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव आणि अन्य नेत्यांनीही या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी काश्मीर खोऱ्यातल्या व्यावसायिकांनी तसंच पर्यटन कंपन्यांनी आज राज्यात बंद पुकारला आहे. काल स्थानिक नागरिकांनी या हल्ल्याच्या विरोधात निदर्शनं करण्यासाठी कँडल मार्च काढला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जम्मू काश्मीरमधल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला मृतांच्या कुटुंबियांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार मृतांमध्ये महाराष्ट्रातल्या दोन पर्यटकांचा समावेश आहे. जम्मू काश्मीरच्या विभागीय आयुक्तांशी चर्चा केल्याची आणि तिथल्या प्रशासनाच्या आपण संपर्कात असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी समाज माध्यमावरील संदेशातून दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही पर्यटकांवरचा हल्ला दुर्दैवी आणि धक्कादायक असल्याचं म्हणत त्याचा निषेध केला आहे. जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जगभरातून निषेध होत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दहशतवादाविरोधात लढण्यासाठी अमेरिका भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. रशिया, संयुक्त अरब अमीराती आणि इराण या देशांच्या नेत्यांनीही या घटनेचा निषेध केला आहे.

**पंतप्रधान-सौदीअरब**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरबचे युवराज मोहम्मद बीन सलमान यांची भेट घेतली. उभय नेत्यांनी सुरक्षा, ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, संस्कृती आदि मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी चार महत्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यात अंतराळ संशोधन, आरोग्य आणि डोपिंग विरोधी क्षेत्राचा समावेश आहे. सौदी अरेबियाने भारतात ऊर्जा, पेट्रोकेमिकल्स, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान यासह विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यामधे स्वारस्य दाखवलं आहे.

**सितरामन-अमेरिका दौरा**

अमेरिकेच्या दौऱ्यावर असलेल्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना भारतात तांत्रिक सहकार्य क्षेत्रात गुंतवणूक करण्याचं आवाहन केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील संधींवर या भेटीत चर्चा करण्यात आली.

**यूपीएससी निकाल**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या गेल्या वर्षी झालेल्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल काल जाहीर झाला. देशभरातून एकंदर 1009 उमेदवार या परीक्षेत यशस्वी झाले आहेत. शक्ती दुबे हिनं या परीक्षेत देशात पहिला क्रमांक पटकावला तर हर्षिता गोयल दुसरी आली आहे. पुण्याच्या अर्चित डोंगरे यानं महाराष्ट्रात प्रथम तर देशात तिसरा क्रमांक पटकावला. पहिल्या 5 यशस्वी उमेदवारांमध्ये 3 महिला आणि 2 पुरुष उमेदवार आहेत.

**वक्फ-रिजिजू**

गरीब मुस्लिमांच्या भल्यासाठीच वक्फ कायद्यात सुधारणा केल्याचा पुनरुच्चार केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रीजिजू यांनी केला. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. लवकरच वक्फ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली जाणार असून जगातली सर्वात मोठी वक्फ मालमत्ता देशात असल्याचं ते म्हणाले. वक्फ सुधारणा कायद्याच्या बाबतीत विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी, सत्य त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच संयुक्त संसदीय समितीने केलेल्या 14 सुधारणा सरकारनं मान्य केल्या अशी माहिती या विधेयकाच्या चाचणीसाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यावेळी म्हणाले. राहुल गांधी यांनी या विधेयकावरच्या चर्चेत सहभागच घेतला नाही. मग या सुधारणा असंवैधानिक आहे, असं ते कसं काय म्हणू शकतात, असा सवाल त्यांनी केला.

**वेव्हज**

मुंबईत वेव्हज परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारत पेव्हिलियनचं उद्घाटन होणार आहे.

भारत पॅव्हेलियनच्या श्रुती, कृर्ती, दृष्टी आणि सर्जकाची कल्पकता या चार भागांमधून प्रेक्षकांना भारताच्या कथाकथनाच्या परंपरेचं दर्शन घडेल. श्रुतीमध्ये कथाकथनाची मौखिक परंपरा, कृतीमध्ये लेखन परंपरा, दृष्टीमध्ये दृश्य माध्यमांचा विस्तार आणि सर्जकाची कल्पकता यातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भविष्यातील कथाकथन यांचा समावेश आहे.

हे पॅव्हेलियन जगाच्या कथाकथनाच्या परंपरेला आकार देण्यातल्या भारताच्या योगदानाबाबतचा संग्रह असेल.

**बिहार एअरशो**

बिहारमध्ये पाटणा इथं सुरू असलेल्या एअर शोमध्ये आज भारतीय हवाई दलाचं सूर्यकिरण पथक चित्तथरारक प्रात्यक्षिकं सादर करणार आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार आणि संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्या हस्ते आज या एअर शो चं औपचारिक उद्घाटन होणार आहे. बिहारमधल्या भोजपूरचे स्वातंत्र्यसेनानी बाबू कुंवर सिंग यांच्या पराक्रमाच्या स्मृतीप्रित्यर्थ हा शो आयोजित करण्यात आला आहे. बाबू कुँवर सिंग यांनी 1857 च्या लढ्यात आपल्या छोट्याशा तुडीसह ब्रिटीश सैन्याचा सामना करुन जगदीशपूर, आराह आणि दानापूर हे भाग ब्रिटीशांच्या ताब्यातून परत मिळवले होते.

**आयपीएल**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या काल लखनौ इथे झालेल्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा 8 गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना लखनौच्या सुपर जायंट्स संघाने 6 गडी बाद 159 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देत, दिल्ली कॅपिटल संघाने 2 गडी बाद 161 धावा करत सामना जिंकला. आज या स्पर्धेत सनरायझर्स हैद्राबाद आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान हैद्राबाद इथे सामना खेळला जाणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**